महाज्योती
— ज्ञानदीप समतेचा —

महाराष्ट्र शासन

इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022

दुरध्वनी क्रं. 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल mahajyotingp@gmail.com

जा.क्र. महाज्योती, नागपूर/ आस्था/ 2252 /2023-24, दिनांक :- 27/10/2023

## परिपत्रक

### UGC-NET/SET-2023-24 परीक्षा पूर्व प्रशिक्षणासाठी प्रतिक्षा यादी

महाज्योती या संस्थेद्वारे UGC-NET/SET-2023-24 परीक्षा पूर्व ऑफलाईन प्रशिक्षण करीता दि.12/10/2023 रोजी पात्र विद्यार्थ्यांची तात्पुरती निवड यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती. दि.17/10/2023 रोजी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण केंद्रात रुजू होण्याकरीता महाज्योतीच्या संकेतस्थळावर परीपत्रकाद्वारे कळविण्यात आले होते. एकूण 1053 विद्यार्थ्यांपैकी 881 विद्यार्थी प्रशिक्षण केंद्रात रुजु झालेले आहेत. त्यामुळे उर्वरीत रिक्त जागांकरीता दि.27/10/2023 रोजी प्रतिक्षा यादी महाज्योतीच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे. दि.25/10/2023 पासून UGC-NET/SET-2023-24 करीता प्रशिक्षण सुरु करण्यात आले असून सदर प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांनी **सी.आर.जी ॲकडमी, पुणे** या प्रशिक्षण केंद्रात जावून दि.02/11/2023 रोजी पर्यंत प्रवेश प्रक्रीया पूर्ण करुन घ्यावी. दि.02/11/2023 रोजी नंतर प्रवेश घेता येणार नाही याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

प्रवेश प्रक्रियेसाठी खालीलप्रमाणे कागदपत्रे असणे आवश्यक आहे:-

1. आधारकार्ड
2. जातीचे प्रमाणपत्र
3. वैध नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र
4. पदवी उत्तीर्ण गुणपत्रिका / प्रमाणपत्र/ उच्च शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र

**प्रशिक्षण केंद्रांचे नाव व पत्ता - संपर्क क्रमांक खालीलप्रमाणे**:-

**सीआरजी ॲकडमी पुणे येथील प्रशिक्षण केंद्र** -

राहूल जाधव - 7666878067/9923268491

पत्ता - 3 रा माळा, फडके हॉल, खजिना विहीर चौक, क्रांतीवीर वासूदेव फडके मार्ग,
सदाशिव पेठ, पुणे - 411030

**रुजु होणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता सूचना:-**

- प्रशिक्षणास रुजु होणाऱ्या विद्यार्थ्यांना निवास व्यवस्था, भोजन, इत्यादी सोय स्वत:च करावी लागेल याची नोंद घ्यावी.
- ज्या विद्यार्थ्यांना MPSC/UPSC किंवा महाज्योतीच्या इतर योजनांचा लाभ घ्यायचे असल्यास अशा विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रिया करु नये. तसेच प्रवेश प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर प्रवेश रद्द किंवा इतर दुसऱ्या योजनेकरीता निवड करता येणार नाही.
- कोणत्याही माध्यमातून व अंतीम निवड प्रक्रियेच्या तसेच प्रशिक्षणाच्या कोणत्याही टप्प्यावर उमेदवारांनी सादर केलेली माहिती चुकीची, दोषपूर्ण व दिशाभूल करणारी असल्यास किंवा या पूर्वी सदर योजनेचा लाभ घेतल्याचे आढळल्यास तसेच महाराष्ट्र राज्य शासनाच्या 'सारथी'या संस्थेच्या निवड यादीत समावेश असल्याचे आढळल्यास त्यांची निवड रद्द करण्यात येईल.
- ज्या विद्यार्थ्यांची MBA-CAT/CMAT व UGC-NET/SET परीक्षा पुर्व प्रशिक्षण करीता निवड झालेली आहे. अशा विद्यार्थ्यांनी कोणत्याही एका प्रशिक्षणाकरीता प्रवेश प्रक्रिया पुर्ण करावे.

(राजेश खवले)
**व्यवस्थापकीय संचालक**
महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर